**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ चा जबाब</u>**

साक्षीदाराचे नावः– **विश्वजीत नामदेव काळे,**

वयः– १४ वर्षे, व्यवसायः– शिक्षण,

राहणारः– गिरजाबाई कॉलनी, **निलंगा, ता. निलंगा. जिल्हा लातूर.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधीज्ञ श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचेमार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०१.** नामदेव काळे माझे वडील आहेत. दि.०५/०४/२०२६ रोजी सकाळी माझे आई वडील शेताकडे गेले होते. मी आणि माझी बहीण घरी अभ्यास करत बसलो होतो. माझी बहीण मला कपडे शिवण्यास घेऊन जायचे आहे असे बोलली. दुपारी ११.४५ वाजता आम्ही आमच्या वडिलांना फोन केला आणि आम्ही कपडे शिवण्यासाठी जात असल्याचे सांगितले. आनंदनगर येथे शिलाईचे दुकान आहे. त्या दुकानात आम्ही कपडे दिले. आम्ही दोघांनी कपडे शिवण्यासाठी टेलरला माप दिले. दुपारी १२.३० वाजता आम्ही घरी गेलो. तेव्हा दरवाजा उघडा होता म्हणून आम्ही वडिलांना फोन केला व तुम्ही घरी आला आहात का असे विचारले तेव्हा त्यांनी ते आणि आमची आई शेतात असल्याचे सांगितले. आम्ही त्यांना दरवाजा उघडा आहे, दरव्याजाचे लॉक सोपासेटवर ठेवलेले होते असे सांगितले. त्यांनी आम्हाला घरात काय झाले ते बघण्यास सांगितले. फोन चालू ठेऊन आम्ही घरात पाहिले. बेडरुममधील कपडे अस्ताव्यस्त पडले होते. कागदपत्र अस्ताव्यस्त खाली पडले होते. आम्ही वडिलांना ती परिस्थिती सांगितली त्यानंतर माझे आई वडिल घरी आले. त्यांनी सर्व

पाहिले. त्यानंतर घरातील काय–काय गेले आहे हे पाहिले. आमच्या घरातील पाच ग्रॅमच्या प्रत्येकी दोन अंगठया चोरीला गेल्या होत्या. ५००/– रुपयेच्या ३४ नोटा चोरीला गेल्या होत्या. त्यानंतर माझ्या वडिलांनी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे अॅड के.एन.पवार यांच्यामार्फत सुरुः–</u>**

०२. टेलरचे नाव अगर त्याच्या दुकानाचे नाव मला आठवत नाही. आमच्या आईने कपडे टेलरकडे फिटींगसाठी नेण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कपडे शिवायला देण्यास गेलो होते असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वडिलांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घरी चोरी झाली नव्हती. आम्ही नवीन कपडे फिटींगसाठी देण्यास गेलो होतो. कपडे फिटींग करण्यासाठी टेलरला पाऊण तास वेळ लागला. आमच्या घरापासून टेलरच्या दुकानात स्कुटीवरुन जाण्यासाठी पाच ते दहा मिनीट वेळ लागतो. आम्ही घराला कुलूप लाऊन गेलो होतो. ते कुलूप माझ्या बहिणीने लावले होते. घराची चावी माझ्या बहिणीकडे होती. आमच्या घराची दुसरी चावी नव्हती. माझे आई वडिल दीडच्या सुमारास घरी आले. आम्ही आई वडिलांना मोबाईलवरुन फोन केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.06.09 17:46:13 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक ०९/०६/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा